के’सागर यांच्या
प्रदीर्घ लेखनानुभवातून
अन् अव्याहत व्यासंगातून
साकारलेल्या संदर्भाची
सातवी सुधारित व विस्तारित आवृत्ती

TET संपूर्ण मार्गदर्शक

डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक सदस्य


बाळ गंगाधर टिळक


महादेवराव नामजोशी


विष्णुशास्त्री चिपळूणकर


गो. ग. आगरकर


वामनराव आपटे

हे लक्षात ठेवा!

(१) टिळक व आगरकर तुरुंगात असताना व्ही. एस. आपटे व एम. बी. नामजोशी यांनी केसरी व मराठा वृत्तपत्राचे कार्य सुरू ठेवले होते.

(२) डोंगरीच्या तुरुंगात टिळक व आगरकर असताना त्यांचे वकिलपत्र फिरोजशहा मेहता आणि काशीनाथपंत तेलंग यांनी घेतले होते.

(३) आगरकरांच्या 'सुधारक' साप्ताहिकाचे ब्रीदवाक्य 'इष्ट असेल ते बोलणार व साध्य असेल ते करणार' हे होते.

(४) १६ डिसेंबर, १८८४ रोजी संमतीवय विधेयकावर आगरकरांनी केसरीमधून लिहिलेला 'वादे वादे जायते तत्त्वबोध:' हा लेख खूप गाजला होता.

(५) स्पेन्सर, मिल, गिबन, रूसो, व्हॉल्तेअर इत्यादी लेखकांच्या विचारांचा आगरकरांवर मूलगामी प्रभाव होता.

(६) आगरकर 'केसरी'चे पहिले संपादक, डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे आजीव सभासद आणि फर्गसन कॉलेजचे प्राचार्य होते.

(७) इ. स. १८९२ ते त्यांच्या मृत्यूपर्यंत म्हणजेच इ. स. १८९५ पर्यंत ते फर्गसन कॉलेजचे प्राचार्य होते.

(८) चातुर्वर्ण्य, कर्मसिद्धान्त, पुनर्जन्माची कल्पना, दैववाद, मूर्तिपूजा इत्यादी दोषांचा निषेध आगरकरांनी स्पष्टपणे केला. अंधश्रद्धा व कालबाह्य रूढी यांवर त्यांनी प्रखर प्रहार केला.

(९) १२ नोव्हेंबर, १८८१ पासून लोकमान्यांच्या केसरीच्या दीड हजार प्रती खपू लागल्या. देशी भाषेतले सर्वांत जास्त खपाचे वृत्तपत्र म्हणून मुंबई सरकारने केसरीची दखल घेतली होती.

(१०) २४ जानेवारी, १८८२ ते २१ फेब्रुवारी १८८२ या काळात मुद्रण स्वातंत्र्याची महती सांगणारी लेखमाला केसरीत प्रसिद्ध झाली होती.

(११) १ जानेवारी, १८८० रोजी पुण्याच्या बुधवार पेठेतील मोरोबादादा फडणिसांच्या ऐसपैस वाड्यात न्यू इंग्लिश स्कूल सुरू करण्यात आले.

(१२) १ जानेवारी, १८८३ पासून न्यू इंग्लिश स्कूल पुण्याच्या शनिवार पेठेतील विष्णू महादेव गद्रे यांच्या वाड्यात हलविण्यात आले.

(१३) आगरकरांनी मुलींना फक्त लिहिणे–वाचणे, तेरीज–बेरीज, भूगोल–खगोल एवढेच न शिकवता मुंबई विद्यापीठाच्या मॅट्रिकच्या परीक्षेला आवश्यक असत ते सर्व विषय शिकवावेत, असे जोरदार प्रतिपादन केले होते. आगरकरांनी केसरीचे संपादकत्व सोडले तेव्हा फीमेल हाय–स्कूलमधील अभ्यासक्रम कसा असावा हाही टिळक आगरकरांमधील वादाचा एक मुद्दा होता.

— महाराष्ट्रातील समाजसुधारक
मुद्देनिहाय परामर्श - डॉ. अनिरुद्ध
या पुस्तकातून उद्‌धृत

TET

७ वी
सुधारित आवृत्ती

संपूर्ण मार्गदर्शक
पेपर पहिला व पेपर दुसरा

पूर्वीच्या
प्रश्नपत्रिका
उत्तरांसह

लेखन–संपादन–संस्करण
के'सागर

K'Sagar
PUBLICATIONS

Published By
Sau. Shobhadevi Kshirsagar
K'Sagar Publications
'Suvarna Shilpa', 444/1 Shaniwar Peth,
Adjacent to Rajmachikar Flour Mill,
Near Dakshinabhimukhi Maruti Temple,
Pune - 411 030
☎ : 24450125, 24455435
: 9823118810
Email : customer@ksagar.com
sales@ksagar.com
website : www.ksagar.com

❉ ❉ ❉

© K'Sagar Publications, Pune : 2014
Thoroughly Revised Seventh Edition : 2025
ISBN 978-81-940869-5-6
The name K'Sagar is registered
under the trade marks Act, 1999

❉ ❉ ❉

Printed at
A. R. Printers
Mangalwar Peth, Pune.

❉ ❉ ❉

Typesetting
K'Sagar Publications, Pune

❉ ❉ ❉

Cover Design
K'Sagar Publications, Pune

❉ ❉ ❉

Price : ₹ 650/-

K'Sagar Book Centre
Nutan Classic, 639, Narayan Peth, Appa Balwant Chowk, Pune - 411 030. ☎ (020) 24453065 / 9823121395 / 9545567862 / 63

K'Sagar's House of Books
Satya-ganesh Sankul, (Saraswati Nivas) 122, Budhwar Peth, Jogeshwari Mandir Lane, Pune - 411 002. ☎ (020) 24465650, 9923810566

K'Sagar's House of Books
39/1, Durga Chambers, Jogeshwari Mandir Lane, Pune - 411 002 ☎ (020) 24483166
9923906500 / 8087722277

Due care has been taken to ensure that the information provided in this book is correct. However, the authors and the publishers bear no responsibility for any damage resulting from any inadvertent omission or inaccuracy in the book.

(१) छत्रपती शिवरायांविषयी महात्मा फुले यांना नितान्त आदर होता. शिवरायांना तर ते बहुजन समाजाचे दैवतच मानीत. जून, १८६९ मध्ये रायगडावरील शिवरायांच्या समाधीचा जीर्णोद्धार करून त्यांनी एक प्रकारे शिवरायांविषयी असलेला त्यांचा आदरभावच व्यक्त केला. सन १८६९ मध्ये त्यांनी लिहिलेला 'छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा पवाडा' प्रसिद्ध आहे.

(२) महात्मा फुले यांचे एक सहकारी नारायणराव मेघाजी लोखंडे यांनी इ.स. १८८४ मध्ये '**बॉम्बे मिल हँडस् असोसिएशन सोसायटी**' या नावाने मुंबईतील गिरणी कामगारांची संघटना स्थापन केली. भारतातील ही पहिलीच कामगार संघटना होय. लोखंडे यांच्या या कार्याला महात्मा फुले यांचा आशीर्वाद होता. तेच या कार्यामागील प्रेरकशक्ती होते.

(३) सन १८७६ ते १८८२ या काळात फुले पुणे नगरपालिकेचे सदस्य होते. नगरपालिका सदस्यत्वाच्या आपल्या कारकिर्दीतही फुल्यांनी गोरगरिबांच्या हितालाच प्राधान्य दिले होते.

(४) २ मार्च, १८८८ रोजी 'ड्यूक ऑफ कॅनॉट' यांच्या सन्मानार्थ पुण्यातील एक प्रतिष्ठित नागरिक हरिरावजी चिपळूणकर यांनी दिलेल्या मेजवानीला सामान्य शेतकऱ्याच्या वेशात उपस्थित राहून येथील सामान्य शेतकरी कशा प्रकारचे जीवन जगतो, याकडे त्यांनी ड्यूकचे लक्ष वेधले.

(५) सन १८७३ मध्ये लिहिलेले आपले 'गुलामगिरी' हे पुस्तक त्यांनी गुलामगिरीविरुद्ध लढणाऱ्या अमेरिकन नागरिकांना अर्पण केले होते, हे या ठिकाणी लक्षात घेणे अगत्याचे आहे. महाराष्ट्रातील बहुजन समाजात फुल्यांनी वैचारिक जागृती घडवून आणली व त्यास कार्यप्रवण बनविले.



महाराष्ट्रातील समाजसुधारक या पुस्तकातून उद्धृत...

के'सागरीय

गेल्या काही वर्षांपासून राज्यात शिक्षक पात्रता परीक्षा घेतली जात आहे. ही परीक्षा प्राथमिक स्तर म्हणजे इयत्ता पहिली ते पाचवी या वर्षांसाठी अध्यापन करू इच्छिणाऱ्या शिक्षकांसाठी व उच्च प्राथमिक स्तर म्हणजे इयत्ता सहावी ते आठवीसाठी अध्यापन करू इच्छिणाऱ्या शिक्षकांसाठी अशा एकूण दोन स्तरांवर घेतली जाणार आहे.

प्राथमिक स्तरासाठी– (१) बालमानस-शास्त्र व अध्यापनशास्त्र (२) भाषा पहिली (३) भाषा दुसरी (४) गणित आणि (५) परिसर अभ्यास अशा पाच घटकांतर्गत तर–

उच्च प्राथमिक स्तरासाठी– (१) बाल-मानसशास्त्र व अध्यापनशास्त्र (२) भाषा पहिली (३) भाषा दुसरी (४) गणित व विज्ञान किंवा सामाजिक शास्त्रे या चार घटकांतर्गत विहित करण्यात आलेला पाठ्यक्रम अतिशय व्यापक व विस्तृत कक्षा असणारा आहे.

या दोन्ही स्तरांवरील अभ्यासक्रमाचा एकत्रित, साकल्याने व आगामी परीक्षेच्या दृष्टिकोनातून विचार करून प्रस्तुतच्या संदर्भाची रचना साकारली आहे. या दोन्ही परीक्षांचा व्यापक अभ्यासक्रम लक्षात घेऊन एकात्मिक व सर्व समावेशक दृष्टिकोनातून पुस्तकाची रचना एकूण आठ विभागांत उपविषयनिहाय करण्यात आली आहे. प्रत्येक उपविषयास आपल्या परीक्षेच्या दृष्टिकोनातून असलेले महत्त्व व त्या त्या उपविषयाची व्याप्ती लक्षात घेऊन प्रत्येक विभागात संबंधित उपविषयां-तर्गत आवश्यक तितकी प्रकरणे दिली आहेत. संपूर्ण पुस्तक वस्तुनिष्ठ चार पर्यायी प्रश्नांच्या स्वरूपात असल्याने ते निश्चितच अधिक परीक्षाभिमुख बनले आहे.

आपल्या अभ्यासक्रमात बालमानस-शास्त्र व अध्यापन पद्धती यांना दिलेले महत्त्व लक्षात घेऊन या उपविषयावरही विशेषत्वाने भरपूर व सर्वसमावेशक प्रश्न दिले आहेत. साधी-सोपी के'सागरीय भाषाशैली याही संदर्भात अगत्याने जपली आहे.

हा संदर्भ साकारताना पूर्वप्रकाशित अशा डी. एड. अभ्यासक्रम (प्रा. महाळंक), संपूर्ण शिक्षणशास्त्र (के'सागर) व इतर के'सागरीय ग्रंथांचा संदर्भ घेतला असल्याने या संदर्भांचा निर्देश येथे करणे मी अगत्याचे मानतो.

विद्यार्थी मित्रांच्या विश्वासास पात्र ठरलेला आणि आपली उपयुक्तता व विद्यार्थि-प्रियता सिद्ध करणाऱ्या के'सागरीय लेखणीतून उतरलेला हा आगळावेगळा संदर्भही विद्यार्थि-मित्रांना यशोमंदिराकडे घेऊन जाणाऱ्या वाटा उजळील, यात शंकाच नाही.

आपला,
व्ही. एस. क्षीरसागर
(K'Sagar)

॥ अ नु क्र म णि का ॥

विभाग पहिला
बालमानसशास्त्र व अध्यापनशास्त्र

१. बालमानसशास्त्र व अध्यापनशास्त्र वस्तुनिष्ठ प्रश्न ११

२. महत्त्वाचे संमिश्र प्रश्न पेपर १ व पेपर २ ५८

विभाग दुसरा
प्राथमिक शिक्षण

१. प्राथमिक शिक्षण वस्तुनिष्ठ प्रश्न ७१

विभाग तिसरा
परिसर अभ्यास

१. परिसर अभ्यास वस्तुनिष्ठ प्रश्न १०७

विभाग चौथा
सामान्य विज्ञान

१. विज्ञान १२७
- महत्त्वाची माहिती
- काही मूलद्रव्ये व संज्ञा
- काही पदार्थांचे द्रवणांक व उत्कलनांक
- अन्नातील पोषणद्रव्ये
- वक्र गोलाकार आरशाचे दोन प्रकार
- भिंगाचे प्रकार
- काही दृष्टिदोष

हे लक्षात ठेवा!
- रसायनशास्त्र व भौतिकशास्त्र
- प्राणिशास्त्र व वनस्पतिशास्त्र
- शरीर आरोग्यशास्त्र
- वस्तुनिष्ठ प्रश्न
- स्पष्टीकरणे

विभाग पाचवा
भाषिक क्षमता मराठी

१. समान अर्थाचे शब्द १८३

२. विरुद्ध अर्थाचे शब्द १९०

३. अनेक शब्दांबद्दल एक शब्द १९५

४. काही महत्त्वाचे शब्द व अर्थ २००

५. सारखे भासणारे भिन्न अर्थाचे शब्द २०३

६. एकाच शब्दाचे अनेक अर्थ २०७

७. काही महत्त्वाच्या म्हणी व अर्थ २०९

८. वाक्प्रचार व अर्थ २१३

९. आलंकारिक शब्द २१९

१०. मराठीचा शब्दसंग्रह २२१

११. शब्दविचार २२३

१२. क्रियापदे २२७

१३. वाक्यांचे रूपांतर २३०

१४. संधी २३४

१५. विभक्ती २३८

१६. समास २४०

१७. प्रयोग २४४

१८. मराठीतील लिंगविचार २४६

१९. मराठीतील वचनविचार २४८

२०. विरामचिन्हे २५०

२१. लेखनातील काही सामान्य चुका २५१

२२. मराठी– भाषा पहिली व दुसरी २५२

विभाग सहावा
इंग्रजी

१. Comprehension २७३

२. Word Formation २७६

३. Voice २८१

४. Direct and Indirect Speech २८५

५. Transformation of Sentences २८९

६. Prepositions २९५

७. Words Followed by Particular Prepositions ३००

८. Tenses	३०३
९. Clauses	३०६
१०. Synonyms	३१०
११. Antonyms	३१३
१२. Idioms and Phrases	३१७
१३. One Word Substitution	३३०
१४. Words Commonly Mis-spelt	३३७
१५. English Teaching Methods Questions	३३९

विभाग सातवा

अंकगणित

अंकगणिताची पायाभूत तयारी

१. संख्या	३५३
२. बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार	३५४
३. ल.सा.वि. आणि म.सा.वि.	३५६
४. वर्ग–वर्गमूळ, घन–घनमूळ	३५७
५. अपूर्णांक	३५८
६. दशांश अपूर्णांक	३५९
७. घातांक	३६१
८. पदावली	३६२
९. सरळव्याज व चक्रवाढ व्याज	३६३
१०. शेकडेवारी	३६५
११. गुणोत्तर व प्रमाण	३६५
१२. सरासरी	३६६
१३. शेअर व दलाली	३६६
१४. विविध परिमाणे	३६८
१५. नफा–तोटा	३६९
१६. काळ – काम – वेग	३७१
१७. बैजिक राशींची किंमत	३७३
१८. बहुपदी	३७३
१९. समीकरणे आणि त्यांची उकल	३७५
२०. भूमितीतील मूलभूत संबोध	३७६
२१. काटकोन त्रिकोण, पायथागोरसचे प्रमेय	३७८
२२. त्रिकोणमिती	३८१
२३. क्षेत्रफळ	३८३
२४. पृष्ठफळ, घनफळ	३८५
२५. आलेख	३८७
२६. गणित अध्यापन पद्धती वस्तुनिष्ठ प्रश्न	३९२

विभाग आठवा

सामाजिक शास्त्रे

१. प्राचीन व मध्ययुगीन भारताचा इतिहास ◘ हे लक्षात ठेवा!	४०१
२. आधुनिक भारताचा इतिहास आधुनिक भारताचा विशेषत: महाराष्ट्राचा इतिहास महाराष्ट्रातील समाजसुधारक निवडक महत्त्वाचे प्रश्न	४१४
३. पृथ्वी, जगातील विभाग, हवामान, अक्षांश-रेखांश ◘ सूर्यमाला ◘ पृथ्वी ◘ जगाचे नैसर्गिक विभाग ◘ महत्त्वाच्या नोंदी ◘ हे लक्षात ठेवा! ◘ वस्तुनिष्ठ प्रश्न	४२८
४. भारत- भौगोलिक व आनुषंगिक ◘ हे लक्षात ठेवा! ◘ वस्तुनिष्ठ प्रश्न	४४६
५. महाराष्ट्राचा भूगोल व महाराष्ट्रविषयक सामान्यज्ञान ◘ हे लक्षात ठेवा! ◘ वस्तुनिष्ठ प्रश्न	४६६
६. भारतीय राज्यघटना	४८३

भारतीय राज्यघटना
- महत्त्वाच्या टीपा
- हे लक्षात ठेवा!
- वस्तुनिष्ठ प्रश्न

७. पंचायतराज ५००
- हे लक्षात ठेवा!
- वस्तुनिष्ठ प्रश्न

८. ग्रामीण भागातील मुलकी व पोलीस प्रशासन ५१४
- हे लक्षात ठेवा!
- वस्तुनिष्ठ प्रश्न

विभाग नववा
टीईटी पेपर पहिला व पेपर दुसरा

१. TET पेपर पहिला २०२१ (इयत्ता १ ली ते ५ वी) ५१७

२. TET पेपर दुसरा २०२१ (इयत्ता ६ वी ते ८ वी) ५३१

३. TET पेपर पहिला २०१९ ५४७

४. TET पेपर दुसरा २०१९ ५६०

महत्त्वाचा बदल

(1) औरंगाबादचे छत्रपती संभाजीनगर, उस्मानाबादचे धाराशिव, याप्रमाणे नामांतर केले गेले आहे. विद्यार्थिमित्रांनी कृपया वरील बदलांची नोंद घ्यावी. या पुस्तकात जेथे जुन्या नावांचा उल्लेख असेल तेथे कृपया योग्य ते बदल करून घेऊन सहकार्य करावे, ही विनंती.

(2) अहमदनगर शहराचे तसेच जिल्ह्याचे नामकरण 'अहिल्यानगर' असे करण्यास 13 मार्च, 2024 रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. केंद्र शासनाची मान्यता प्रतीक्षाधीन आहे. या अनुषंगाने पुढील घडामोडींकडे लक्ष असू द्यावे.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९

भारत सरकारने प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाच्या संदर्भात उचललेले अत्यंत महत्त्वाचे पाऊल म्हणून 'बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९' या अधिनियमाचा उल्लेख करावा लागेल.

कायद्याची आवश्यकता

आधुनिक काळात शिक्षणाला प्राप्त झालेले महत्त्व लक्षात घेता शिक्षणाचा हक्क हा मूलभूत हक्क मानण्यात यावा अशी मागणी बऱ्याच दिवसांपासून करण्यात येत होती. या मागणीची उचित दखल घेऊन भारतीय संसदेने सन २००२ मध्ये शहाऐंशीवा घटनादुरुस्ती कायदा संमत केला. या घटनादुरुस्ती कायद्यान्वये भारतीय राज्यघटनेत '२१ ए' हे नवे कलम समाविष्ट करण्यात आले. त्यातील तरतुदीनुसार मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण मिळणे हा आता ६ ते १४ वर्षे वयोगटातील मुलांसाठी मूलभूत हक्क ठरला आहे. तथापि, राज्यघटनेत दिलेल्या शिक्षणाच्या हक्काच्या अंमलबजावणीसाठी भारत सरकारने त्यासंबंधीचा कायदा करणे गरजेचे होते. त्यानुसार भारतीय संसदेने 'बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९' संमत केला. १ एप्रिल, २०१० पासून हा अधिनियम कार्यान्वित झाला. त्यानंतर भारत सरकारने ९ एप्रिल, २०१० रोजी 'बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०१०' राजपत्रात प्रसिद्ध केले.

महाराष्ट्र सरकारनेही वरील अधिनियमाला अनुसरून ११ ऑक्टोबर, २०११ रोजी 'महाराष्ट्र

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११' प्रसिद्ध केले.

अधिनियमाची ठळक वैशिष्ट्ये

'बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९' ची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

(१) **प्रत्येक मुलाला मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क :** या अधिनियमान्वये वय वर्षे ६ ते १४ या वयोगटातील प्रत्येक मुलाला त्याचे प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत जवळच्या शाळेत मोफत व सक्तीचे शिक्षण मिळण्याचा हक्क प्राप्त झाला आहे.

(२) **शाळेत प्रवेश न घेतलेल्या किंवा शाळेत प्रवेश घेतलेल्या पण प्राथमिक शिक्षण पूर्ण न केलेल्या मुलांसाठी विशेष तरतूद :** ज्या मुलांचे वय सहा वर्षांपेक्षा अधिक आहे पण त्यांनी कोणत्याही शाळेत प्रवेश घेतलेला नाही किंवा ज्या मुलांनी शाळेत प्रवेश घेतलेला होता पण ज्यांचे प्राथमिक शिक्षण पूर्ण झाले नाही, त्या मुलांना त्यांच्या वयानुसार योग्य त्या वर्गात प्रवेश देण्यात यावा; तथापि, अशा मुलांना त्या वर्गातील इतर मुलांच्या बरोबरीत आणण्यासाठी खास प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करण्यात यावी अशी तरतूद या अधिनियमात करण्यात आली आहे.

(३) **शाळा बदलण्याचा हक्क :** एखाद्या मुलाने ज्या शाळेत प्रवेश घेतला आहे, त्या शाळेत प्राथमिक शिक्षण पूर्ण होण्याची व्यवस्था नसेल म्हणजे त्या शाळेत इयत्ता आठवीपर्यंतचे वर्ग नसतील तर ती शाळा बदलून दुसऱ्या शाळेत प्रवेश मिळविण्याचा हक्क त्यास राहील.

(४)**संबंधित राज्य शासन आणि स्थानिक प्राधिकरण यांची शाळा सुरू करण्यासंबंधीची जबाबदारी :** या अधिनियमातील तरतुदींची अंमलबजावणी होण्यासाठी ज्या विभागात किंवा प्रादेशिक क्षेत्रात किंवा वस्तीत शाळेची सुविधा उपलब्ध नसेल, अशा विभागात किंवा प्रादेशिक क्षेत्रात किंवा वस्तीत हा अधिनियम अमलात आल्यापासून तीन वर्षांच्या कालावधीत शाळा सुरू करण्याची जबाबदारी संबंधित राज्य शासन आणि स्थानिक प्राधिकरण यांच्यावर टाकण्यात आली आहे.

(५) **संबंधित राज्य शासन आणि स्थानिक प्राधिकरण यांची कर्तव्ये–** प्रत्येक बालकाला मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण मिळेल अशी व्यवस्था करणे हे संबंधित राज्यशासन आणि स्थानिक प्राधिकरण यांचे कर्तव्य असेल. या संदर्भात 'सक्तीचे शिक्षण' याचा अर्थ–

(अ) सहा वर्षे ते चौदा वर्षे या वयोगटातील प्रत्येक बालकाला मोफत प्राथमिक शिक्षण देण्याची व्यवस्था करणे.

(ब) सहा वर्षे ते चौदा वर्षे या वयोगटातील प्रत्येक बालकाला शाळेत प्रवेश मिळेल आणि त्याचे प्राथमिक शिक्षण पूर्ण होईल अशी व्यवस्था करणे.

याखेरीज संबंधित राज्य शासन आणि स्थानिक प्राधिकरण यांनी पुढील कर्तव्ये पार पाडावयाची आहेत.

(अ) दुर्बल घटकांतील मुले आणि प्रतिकूल गटांतील मुले यांच्या बाबतीत शिक्षणात भेदभाव केला जाणार नाही याकडे लक्ष पुरविणे.

(ब) शाळेसाठी इमारत, शिक्षक वर्ग व शिक्षणाची साधने यांसारख्या पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे.

(क) प्रत्येक मुलाला शाळेत प्रवेश मिळेल, तो शाळेत उपस्थित राहील व त्याचे प्राथमिक शिक्षण पूर्ण होईल याची काळजी घेणे.

(ड) बालकांना चांगले शिक्षण मिळेल याची व्यवस्था करणे.

(इ) शिक्षकांसाठी प्रशिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करून देणे.

(६) **आईवडील किंवा पालक यांचे कर्तव्य :** आपल्या मुलाला किंवा पाल्याला शाळेत पाठविणे, हे प्रत्येक आई-वडील किंवा पालक यांचे कर्तव्य असेल.

(७) **राज्यशासनाची जबाबदारी :** या अधिनियमातील तरतुदीनुसार तीन वर्षांवरील बालकांची प्राथमिक शिक्षणाची पूर्वतयारी होण्यासाठी, त्यांची काळजी घेतली जाण्यासाठी आणि त्यांना पूर्व-प्राथमिक शिक्षण मिळण्यासाठी संबंधित राज्य शासनाला पूर्वप्राथमिक शिक्षणाची व्यवस्था करण्यास सांगितले गेले आहे. मात्र पूर्वप्राथमिक शिक्षण हे राज्य शासनाचे कर्तव्य समजण्यात आले नाही हे स्पष्ट करणे आवश्यक आहे.

(८) **शाळा व शिक्षक यांची जबाबदारी :** या अधिनियमान्वये प्राथमिक शाळा व शिक्षक यांचीही जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. प्रत्येक शाळेने आपल्या विद्यार्थ्यांना सक्तीचे व मोफत शिक्षण देण्याची जबाबदारी स्वीकारण्याबाबत आणि राज्य शासन किंवा स्थानिक प्राधिकरण यांनी मागणी केलेली प्रत्येक माहिती पुरविण्याबाबत सांगण्यात आले आहे.

(९) **देणगी घेण्यास प्रतिबंध :** बालकाला शाळेत प्रवेश देतेवेळी कोणत्याही शाळेला देणगी (कॅपिटेशन फी) घेता येणार नाही तसेच कोणत्याही छाननी पद्धतीसाठी (Screening Procedure) बालकास किंवा त्याच्या पालकास किंवा माता-पित्यास भाग पाडले जाणार नाही, अशी स्पष्ट तरतूद या अधिनियमात करण्यात आली आहे.

(१०) **प्रवेश नाकारला न जाण्याची तरतूद :** शाळेचे शैक्षणिक वर्ष सुरू होताना शाळेत प्रवेश घेण्यासाठी येणाऱ्या कोणत्याही बालकाला प्रवेश देणे नाकारता येणार नाही. म्हणजे प्रत्येक बालकाला शाळेत प्रवेश देणे त्या शाळेवर बंधनकारक ठरविण्यात आले आहे.

(११) **बालकाला त्याच वर्गात ठेवण्यावर प्रतिबंध :** या अधिनियमान्वये कोणत्याही बालकाला शैक्षणिक वर्षाच्या समाप्तीनंतर त्याच वर्गात ठेवण्यावर म्हणजे त्यास अनुत्तीर्ण करण्यावर प्रतिबंध घालण्यात आला आहे. तसेच कोणत्याही बालकास शाळेतून बाहेर काढता येणार नाही किंवा त्यास शाळेतून काढून टाकता येणार नाही असे बंधन प्रत्येक शाळेवर घालण्यात आले आहे.

(१२) **शासन करण्यास प्रतिबंध :** या अधि-नियमातील तरतुदीप्रमाणे कोणत्याही बालकाला शारीरिक शासन करण्यास किंवा त्याला मानसिक त्रास देण्यास/छळ करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे.

जो कोणी या तरतुदींचे उल्लंघन करेल किंवा तरतुदींस छेद देण्यासारखे वर्तन करेल त्याच्याविरुद्ध सेवानियमांतर्गत शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

(१३) **मान्यतेशिवाय शाळा स्थापन करण्यास मनाई :** या अधिनियमान्वये कोणत्याही खाजगी शाळेला मान्यतेचे प्रमाणपत्र प्राप्त करणे अनिवार्य करण्यात आले आहे. नियमानुसार मान्यता मिळाल्याखेरीज शाळा स्थापन करण्यास मनाई करण्यात आली आहे.

जी कोणी व्यक्ती आवश्यक त्या मान्यतेखेरीज शाळा सुरू करील त्या व्यक्तीला एक लाख रुपयां-पर्यंत दंड केला जाऊ शकेल. त्यानंतरही त्या व्यक्तीने शाळा सुरू ठेवली तर अशी शाळा सुरू असेपर्यंत प्रत्येक दिवशी दहा हजार रुपये दंड याप्रमाणे संबंधित व्यक्तीकडून दंडाची वसुली केली जाईल.